# साहित्यात मानवतावादाची बीजे पेरणारा मुक्तिदाता :डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. युवराज देवाळे,** कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.

---

'साहित्य आणि समाज यांचे संबंध अनन्यसाधारण स्वरूपाचे आहेत' आणि ' भारतात प्राचीन काळापासून साहित्य परंपरा आहे' ही दोन्ही वाक्य परिचित असली तरी पूर्ण सत्य नाहीत. भारतीय समाज व्यवस्था आणि साहित्याचा विचार करता प्राचीन काळापासूनच सर्व समाजाचे प्रतिबिंब यथातथ्य प्रमाणात साहित्यात दिसत नाही. समाज आणि साहित्यावर अभिजन वर्गाचा प्रभाव प्राधान्याने दिसून येतो. शोषित, पीडित, कष्टकरी वर्ग समाज व्यवस्थेत जसा दबला गेला, तसाच साहित्यातही दुर्लक्षितच राहिला. मराठी साहित्याचा विचार करता प्रारंभ ते १९२० पूर्वकाळात काही अपवाद वगळता समाजाच्या अध:स्तरातील लेखनास मध्यवर्ती प्रवाहात स्थान मिळालेले नाही. संत साहित्यातील चोखामेळा ते आंबेडकरपूर्व काळातील साहित्याकडे बारकाईने पाहिल्यास महात्मा फुलेंचा अपवाद वगळता प्रस्थापितांच्या दृष्टिकोनातूनच लेखन आणि त्याचा स्वीकार केल्याचे दिसून येते. सहानुभूती आणि हक्क यातील दरी या जवळपास ७०० वर्षांच्या कालखंडातील साहित्याला ओलांडता आली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेतील जातीय उतरंडीतील सर्वात खालच्या स्तराला आपल्या अस्तित्वाची आणि अस्मितेची जाणीव करून दिली. पारंपरिक भारतीय समाजाला खडबडून जागे करताना त्यांनी समाज आणि धर्मव्यवस्थेलाही आव्हान दिले. माणूस आणि मानवता ही त्यांच्या अस्तित्व लढ्याची प्रेरणा पुढे मराठी साहित्यात केंद्रस्थानी आली. स्वत्व जाणीवेतून निर्माण झालेल्या साहित्याचा हा प्रवाह पुढे 'दलित साहित्य' या नामाभिधानाने ओळखला जाऊ लागला. 'आंबेडकरी साहित्य' अशी वेगळी ओळख असणाऱ्या या साहित्य प्रवाहात कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथने, समीक्षा असे बहुविध लेखन प्रकार हाताळले गेले. आजही ती निर्मिती जोरकसपणे सुरू आहे. स्वतःचे स्वतंत्र सौंदर्यशास्त्र निर्माण केलेल्या या साहित्य प्रवाहाच्या केंद्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य असल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात या तथ्याचा शोध घ्यायचा आहे.

**उद्दिष्ट्ये:-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याचा मराठी साहित्यावरील प्रभाव अभ्यासणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारदृष्टीतून आकारास आलेल्या दलित साहित्य प्रवाहाचे स्वरूप अभ्यासणे.

**गृहितके:-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार दलित साहित्याची प्रेरणा आहे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहेत

३) दलित साहित्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचार, व्यक्तिमत्व आणि कार्याचा प्रभाव आढळतो.

**विषय प्रवेश:-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने विचार करता मराठी साहित्य संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व न करता त्यातील प्रत्येकाला कप्पेबंद स्वतंत्र स्थान देताना दिसते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळी दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व उदयास आले. स्वातंत्र्यांबरोबरच सामाजिक समता हा त्यांच्या विचारसरणीचा वेगळा पैलू होता तात्कालीन स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांहून मानव मुक्ती हा त्यांच्या लढ्याचा वेगळा आयाम होता. त्यांच्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' मधील लेखनातून भारतीय दलित समाजाचे पशुतुल्य, अपमानजनक जीवन अधोरेखित करून मानवतेची मूल्ये प्रतिष्ठित करण्याचे आवाहन त्यांनी व्यवस्थेला केले. त्यांच्या वाणी लेखणीतून नवे समाजभान तयार झाले. १९२० ते १९५६ हा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा कालखंड 'मूकनायक ते महानिर्वाण ' असा संबोधला जातो. या कालखंडात त्यांनी अस्पृश्यांच्या गांजलेपणाची कैफियत गावकुसाला धडका देण्यापासून गोलमेज परिषदेपर्यंत विविधतेने मांडली. त्यांच्या अथक धडपडीतून निर्माण झालेल्या चैतन्याचा प्रवाह प्रथम दलित शाहीरी जलशातून चळवळीकडे गतिमान झाल्याचे दिसते.[१] यापूर्वीच्या साहित्याविष्काराहून या रचनांचे स्वरूप प्राय: वेगळे दिसते. अभिजनांच्या अनुकृतीपेक्षा स्वतःची हक्काची जाणीव, स्वतंत्र अस्मिता हे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण आहे. दलित साहित्याचा उगम शोधण्याच्या प्रयत्नात अनेक अभ्यासक श्री. म. माटे, किसन फागु बन्सोड, महात्मा फुले यांच्यापासून थेट गौतम बुद्धांपर्यंत पोहोचतात. काही संत परंपरेतील चोखामेळ्यांच्या जात उल्लेखाचे पुरावे मांडतात , मात्र मानवतावाद आणि दलित जाणीव याची निश्चित मांडणी यामध्ये आढळत नाही. अस्पृश्यतेचे उल्लेख आणि सहानुभूतीच्या मर्यादेमुळे दलित जीवनाचे सुस्पष्ट प्रतिबिंब त्यामध्ये आढळत नाही. डॉ. बाबासाहेबांचे दिशादर्शक विचार आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीतून नवी दृष्टी घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांनी दलित साहित्याची पायाभरणी केली. १९३६ मध्ये दादर येथील अखिल मुंबई इलाखा परिषदेतील बाबासाहेबांचे भाषण दलित साहित्याला बीज भाषण स्वरूपात मार्गदर्शक असल्याचे मानले जाते.[२] जातीभेद, अस्पृश्यता, दारिद्र्य ,अज्ञान, निरक्षरता यांच्या प्रभावाने ग्रासलेल्या दलित समाजाचे साहित्य रंजक, कल्पनाविलासी न होता समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारे, परंपरेला नकार देणारे व प्रसंगी जाब विचारणारे असायला हवे ही जाणीव नवे भान

आलेल्या साहित्यिकांनी निर्मितीच्या केंद्रस्थानी मानली. 'दलित साहित्याचे सांस्कृतिक महत्त्व ओळखून त्याचे योग्य दखल घेतली पाहिजे, असा सुस्पष्ट ठराव १९५७ मध्ये मांडला गेला[३] ही बाब या संदर्भात अधिक महत्त्वाची आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणानंतर जागृत झालेल्या पहिल्या पिढीतील लेखकांनी बाबासाहेबांचे कालसुसंगत विचार, मानवतावादी दृष्टिकोन आणि आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा आपल्या साहित्यात आवेश आणि सौंदर्यदृष्टी या दोन्ही अंगाने आणण्याचा प्रयत्न केला. दलित साहित्यातील सर्वच वाङ्मय प्रकारातील विपुल रचना पाहिल्यावर त्यातील वेगळेपणातही काही समान पैलू असल्याचे प्रकर्षाने नजरेस येते. हे साहित्य व्यक्तीची प्रतिष्ठा जपते ,पण ते व्यक्ती व विभूती पूजक नाही. ते आत्ममग्नतेत रमणारे नसून समाजनिष्ठ आहे. कृतिशीलता हा त्याचा स्थायीभाव आहे. तळागाळातील व्यक्तीचे दुःख - दैन्य मांडताना समष्टीच्या दुःखाशी ते जोडते. हजारो वर्षांच्या दडपलेल्या समाज जीवनाचा पट उलगडताना अन्यायी परंपरेच्या दांभिकतेचा अमानवी चेहरा ते उघडा पाडते. दुबळ्या , हरलेल्या जनसामान्यांची व्यथा मांडताना संघर्षासाठी प्रेरणा देण्याचे काम ते करते. या सर्वांचे बीज किंवा उगमस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार. त्यांची जीवनदृष्टी, त्यांच्या चळवळी यामध्ये सापडते[४] असे म्हणता येईल दलित साहित्यातील काही नवख्या साहित्यिकांचा प्रचारकी, आक्रमक आणि एकांगी अभिनिवेश बाजूला ठेवून निकोप दृष्टीने लेखन करणाऱ्या दया पवार, बाबुराव बागुल ,नामदेव ढसाळ, दत्ता भगत, शंकररव खरात, गंगाधर पानतावणे, शरणकुमार लिंबाळे यांच्यापासून ते अगदी अलीकडच्या प्रज्ञा दया पवार आदी प्रभृतींच्या साहित्य व समीक्षा लेखनाचा परामर्श घेतला तर दलित साहित्याची निश्चित प्रतिमा आपल्या हाती येते. हे साहित्य माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जाती श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे आहे हे निदर्शनाला येते. अशा साहित्यालाच दलित साहित्य मानावे असे आग्रही प्रतिपादन बाबुराव बागुल यांनी केले आहे.[५] दलित साहित्याच्या केंद्रस्थानी असलेली वेदना, विद्रोह आणि नकार ही तत्त्वे बाबासाहेबांच्या प्रेरणेतूनच आल्याचे मानले जाते. मध्यवर्ती धारेतील साहित्य यातील वेदनेचे सहानुभूतीने स्वागत करते, मात्र नकार आणि विद्रोहाकडे पारंपरिक कर्मठ भूमिकेतून पाहते. त्यांच्या संघर्ष, विद्रोहाला हिंसक प्रतिमेत बंदिस्त करू पाहते, मात्र बाबासाहेब संघर्षाला हिंसेपेक्षा मानवी मूल्यांच्या स्थापनेसाठीची आवश्यक बाब[६] असल्याचे अधोरेखित करतात. जे माणूस म्हणून आपल्या हक्काचे आहे ते मिळवण्यासाठी आपण योग्य कृती केलीच पाहिजे, इतक्या साध्या सरळ शब्दात संघर्षाला साहित्याचा मूलमंत्र म्हणून ते प्रतिष्ठित करू पाहतात .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ललित लेखन केले नाही, मात्र स्वातंत्र्य चळवळ आणि सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने मांडलेल्या विचार व कार्याच्या प्रभावाने एका विशाल जनसमुदायाला मुक्तीचा मार्ग सापडला. त्यांच्या विचारातून दलित साहित्याचा स्वतंत्र वांग्मयीन प्रवाह उदयास आला व प्रतिष्ठितही झाला. साहित्याच्या प्रातिभ व्यवहाराला मानवमुक्तीच्या लढ्याशी अभिन्नत्वाने जोडण्याचे काम बाबासाहेबांच्या क्रांतदर्शी विचार आणि कार्यकर्तृत्वाने केल्याचे आपल्या प्रत्ययास येते. मराठी दलित साहित्याच्या निर्मितीच्या मूळाशी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दीपस्तंभासमान कार्यकर्तृत्वाचा प्रस्तुत शोधनिबंधाच्या मर्यादेत वेध घेताना पुढील निष्कर्ष हाती आले.

**निष्कर्ष:-**

१. दलित साहित्य निर्मितीस डॉ. आंबेडकरांचे विचार प्रेरणादायी ठरले.

२. दलित साहित्याच्या केंद्रस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वेदना, विद्रोह, नकार ही तत्त्वे आहे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बहुआयामी प्रतिमा दलित साहित्यात दीपस्तंभासारखी वारंवार प्रत्ययास येते.

**संदर्भ:-**

१. डॉ. शरणकुमार लिंबाळे, साहित्य: ग्रामीण आणि दलित, (संपादक- डॉ. ईश्वर नंदपुरे व इतर) विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., २००२ ,पृष्ठ -१९४.

२. डॉ. राजेंद्र वाटाणे, तत्रैव, पृष्ठ -३२०.

३. डॉ. शरणकुमार लिंबाळे, उनि., पृष्ठ- १९३ .

४. अर्जुन डांगळे ,दलित साहित्य: एक अभ्यास, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वि. आ., १९९८, निवेदन,पृष्ठ-८.

५. प्रा दत्ता भगत निळी वाटचाल प्रतिमा प्रकाशन पुणे प्रवाह २००१ पृष्ठ ५१

६. कटारे मोतीराम ,फुले- आंबेडकरी प्रेरणेचे नवे कवी नवे आकलन , प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ.,२००६, पृष्ठ- १७७.